Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शुक्रवार, दि. १५ मे २०२६ । वर्ष १ । अंक ४० । पाने २।
DIGITAL EDITION

पारोळ्यात वारंवार वीज खंडित; नागरिक संतप्त!

(पान २ वर)



» Selected

### तैवानवरून चीनचा अमेरिकेला इशारा

मुंबई: अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यात गुरुवारी इराण युद्ध, व्यापार आणि ऊर्जा सुरक्षेवर दीर्घ चर्चा झाली. या वेळी तैवान मुद्द्याची चुकीच्या पद्धतीने हाताळणी केल्यास दोन्ही देशांत संघर्ष उद्भवू शकतो, असा इशारा जिनपिंग यांनी ट्रम्प यांना दिला. ऊर्जेची जागतिक गरज लक्षात घेता होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणे आवश्यक असल्याचे दोन्ही नेत्यांनी मान्य केले. ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यामध्ये चर्चेची पहिली फेरी बीजिंगमध्ये पार पडली. ट्रम्प यांनी जिनपिंग आणि त्यांच्या पत्नी यांना २४ सप्टेंबर रोजी व्हाइट हाऊसमध्ये येण्याचे आमंत्रण दिले. चीन आणि अमेरिकेमध्ये सकारात्मक द्विस्तरावरील संबंध प्रस्थापित करण्यासाठी 'नवे उद्दिष्ट' आखण्यावर एकमत झाल्याचे जिनपिंग यांनी सांगितले. ते म्हणाले, 'चीन-अमेरिकेमध्ये सकात्मक सामरिक स्थिरता राखणारे संबंध प्रस्थापित होण्याचे नवे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

## "आईची इच्छा पूर्ण केली", सोलापुरात ५२ हजार कोटींच्या रस्त्यांची आठवण

# अक्कलकोट-पंढरपूर रस्त्याच्या आठवणींनी गडकरी भावूक

## अहमदनगर-अक्कलकोट रस्ता, सोलापूर रिंग रोड आणि पंढरपूर चौपदरीकरणाला गती

जन सम्राट टाईम्स

**सोलापूर | प्रतिनिधी : "माझ्या आईची सोलापूराशी एक भावनिक आठवण जोडलेली आहे. मृत्यूपूर्वी ती अक्कलकोट आणि गाणगापूरला गेली होती. घरी परतल्यानंतर तिने मला सांगितले होते की, 'नितीन, आयुष्यात संधी मिळाली तर गाणगापूर-अक्कलकोट-पंढरपूरचा रस्ता चांगला कर.' आईच्या त्या इच्छेला मी शब्द दिला आणि तो पूर्णही केला**

अशा भावनिक शब्दांत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सोलापुरातील विकासकामांचा आढावा घेताना आठवणींना उजाळा दिला. सोलापुरात आयोजित कार्यक्रमात बोलताना गडकरी यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देत आहे. "सोलापुरात एकाच दिवशी तब्बल ५२ हजार कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पांचे भूमिपूजन झाले होते. त्यावेळी माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी एवढी मोठी घोषणा प्रत्यक्षात होईल का, असा प्रश्न विचारला होता. मात्र, मी त्यांना सर्व कामे पूर्ण होतील, असा शब्द दिला होता. आज एक सोलापूर शहरातील उड्डाणपूल वगळता सर्व कामे पूर्ण झाली आहेत," असे त्यांनी स्पष्ट केले. सोलापूर शहरातील उड्डाणपूलाचे काम क्लिअरन्सअभावी रखडल्याचे सांगत गडकरी म्हणाले, "आता या प्रकल्पाचा खर्च दुप्पट झाला आहे. मात्र खासदार प्रणिती शिंदे आणि आमदार ज्योती वाघमारे यांनी पुढाकार घेऊन दिल्लीमध्ये पाठपुरावा करावा. मी हे काम निश्चित पूर्ण करून देईन." "मला खोटं बोलायची सवय नाही. जे शक्य आहे तेच सांगतो आणि ते पूर्ण करतो," असे ठाम विधान करत गडकरी यांनी २०२९ पर्यंत सोलापूर जिल्ह्यात तब्बल १ लाख कोटी रुपयांची विकासकामे करून देण्याची घोषणा केली. यावेळी त्यांनी अहमदनगर-करमाळा-सोलापूर चौपदरीकरणासाठी ११०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती दिली. तसेच अहमदनगर ते अक्कलकोट महामार्ग, सोलापूर रिंग रोड आणि टेंभूर्णी ते पंढरपूर रस्त्याच्या चौपदरीकरणाला गती देण्यात येणार असल्याचे सांगितले. पंढरपूरसाठी स्वतंत्र रिंग रोड मंजूर करण्याचाही निर्णय त्यांनी जाहीर केला. मुंबई ते बंगळुरू या प्रवासाबाबत मोठी घोषणा करताना गडकरी म्हणाले, "नवीन ग्रीनफिल्ड महामार्गामुळे मुंबई ते बंगळुरू हे अंतर अवघ्या साडेपाच ते सहा तासांत पूर्ण करता येईल. हा प्रकल्प देशाच्या वाहतूक व्यवस्थेत क्रांती घडवेल." सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड कॉरिडॉरचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, "हा मार्ग सोलापूर जिल्ह्याचे नशीब बदलणारा ठरेल.



### सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला नवी गती

आळंदी ते पंढरपूर पालखी महामार्गाचे ८० टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगत गडकरी यांनी तोडले-बोंडले येथे १०० कोटी रुपयांच्या फ्लायओव्हरलाही मंजुरी दिल्याचे जाहीर केले. अक्कलकोट-गाणगापूर रस्ता सध्या खराब अवस्थेत असला तरी तोही लवकरच चांगल्या दर्जाचा करण्यात येणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले. गडकरी यांच्या घोषणांमुळे सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला नवी गती मिळणार असल्याची भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# शहरातील सर्वच अतिक्रमणे हटवा!

## सामाजिक कार्यकर्ते आक्रमक

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे शहरात महानगरपालिकेकडून सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेवरून आता वाद निर्माण झाला असून, "विशिष्ट भाग आणि विशिष्ट समुदायांवरच कारवाई होत आहे," असा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. सामाजिक कार्यकर्त्यांनी मनपा आयुक्तांची भेट घेत शहरातील सर्वच अतिक्रमणे निष्पक्षपणे हटविण्याची मागणी केली. बापू बागुल यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मनपा प्रशासनाला निवेदन देत शहरातील विविध भागांतील अतिक्रमणांची सविस्तर माहिती आयुक्तांसमोर मांडली. यावेळी शहरातील अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाल्याचा आरोप करत संबंधित ठिकाणांची यादीही प्रशासनाला देण्यात आली. सामाजिक कार्यकर्त्यांनी मनपा प्रशासनावर अतिक्रमण मोहिमेत भेदभाव होत असल्याचा आरोप केला. "विशिष्ट भागातच मोहीम राबवून इतर भागांकडे दुर्लक्ष केले जात आहे. अतिक्रमण हटाव कारवाई सर्वांसाठी समान असली पाहिजे," अशी भूमिका कार्यकर्त्यांनी मांडली. शहरातील



सार्वजनिक रस्ते, बाजारपेठा आणि पदपथांवरील सर्वच अतिक्रमणे तात्काळ हटवावीत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने मागील आठवड्यापासून सातत्याने मोहीम सुरू केली आहे.

### १८ मेपासून आंदोलनाचा इशारा

बापू बागुल यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, "मनपा प्रशासनाने आम्ही दिलेल्या यादीतील अतिक्रमणांवर कारवाई केली नाही, तर १८ मेपासून महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर तीव्र आंदोलन करण्यात येईल." शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेवरून आता राजकीय आणि सामाजिक वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

# जळगाव मनपा महासभा वादळी; विकासकामांवरून सत्ताधाऱ्यांतच जुंपली!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी ;** जळगाव महानगरपालिकेची गुरुवारी पार पडलेली महासभा प्रचंड वादळी ठरली. विविध विकासकामे, प्रशासकीय दिरंगाई, शहरातील नागरी समस्यांवरून सत्ताधारी नगरसेवकांमध्येच जोरदार खडाजंगी झाली. विशेष म्हणजे, महापौर दीपमाला काळे आणि उपमहापौर मनोज चौधरी यांच्यात व्यासपीठावरच शाब्दिक चकमक उडाल्याने सभागृहात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. मेहरूण परिसरातील ३० मीटर रस्त्याच्या फेरआखणीचा विषय सभागृहात चर्चेला आला असता, संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने हा विषय तहकूब करण्याची मागणी भाजप नगरसेवक दीपक सूर्यवंशी यांनी केली. महापौर दीपमाला काळे यांनी त्यास सहमती दर्शवली. मात्र, शिवसेना (शिंदे गट) नगरसेवक विष्णू भंगाळे यांनी या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत भाजपवर एकतर्फी निर्णय घेत असल्याचा आरोप केला. आक्रमक भूमिका घेत त्यांनी थेट सभागृहाच्या लॉबीपर्यंत



जाऊन निषेध नोंदवला. अखेर या विषयावर शिवसेना तटस्थ राहील, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. महासभेतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो महापौर आणि उपमहापौरांतील वाद. उपमहापौर मनोज चौधरी यांनी आपल्या प्रभागातील समस्या मांडण्यासाठी वेळ मागितला असता, त्यावरून व्यासपीठावरच महापौरांशी त्यांची शाब्दिक चकमक झाली. संतप्त झालेल्या चौधरी यांनी थेट व्यासपीठ सोडत नगरसेवकांच्या बाकांवर जाऊन स्थान घेतले. यानंतर त्यांनी शहरातील रस्ते, ढिसाळ कारभारावर जोरदार टीका करत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. "माझ्या सूचनांकडे जर असेच दुर्लक्ष होणार असेल, तर मी पुढील महासभेला उपस्थित राहणार नाही," सभागृहात सत्ताधारी शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपमध्ये संघर्ष रंगलेला असताना, विरोधी बाकांवरील शिवसेना (ठाकरे गट) यांनी मात्र भाजपच्या भूमिकेला समर्थन दिले. ठाकरे गटाच्या या भूमिकेमुळे मनपा राजकारणात नव्या समीकरणांच्या चर्चांना उधाण आले आहे.अॅटलांटा महापालिका फसवणूक प्रकरणावरून महापौर दीपमाला काळे आणि भाजप नगरसेवकांनी मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांना चांगलेच फैलावर घेतले.

### बंद एसीमुळे नगरसेवक हैराण

दरम्यान, महासभेदरम्यान सभागृहातील वातानुकूलित यंत्रणा बंद असल्याने नगरसेवकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागला. जळगावमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसवर पोहोचले असताना, एसी बंद असल्याने सभागृहातील वातावरण अधिकच तापले होते. अनेक दिवसांपासून एसी नादुरुस्त असल्याची माहिती समोर आल्याने नगरसेवकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली.

# रस्ता, लाईट अन् कचऱ्याच्या प्रश्नांवर स्थायी समिती सभेत गदारोळ

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत शहरातील रस्ते, वीजपुरवठा आणि कचरा व्यवस्थापनाच्या समस्यांवरून जोरदार गदारोळ पाहायला मिळाला. स्थायी समिती सभापती लताबाई सोनार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध नगरसेवकांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. शहरातील खराब रस्ते, ठप्प स्वच्छता व्यवस्था आणि वारंवार उद्भवणाऱ्या विजेच्या समस्यांमुळे नागरिक त्रस्त असल्याचा मुद्दा नगरसेवकांनी सभागृहात उपस्थित केला. विशेषतः कचरा व्यवस्थापन आणि रस्त्यांच्या समस्यांवरून नगरसेविका वंदना भामरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत तीव्र नाराजी व्यक्त केली. विजेच्या प्रश्नावरही संताप तर वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि अपुऱ्या स्ट्रीट लाईट्सच्या समस्यांवरून नगरसेवक धीरज कलंत्री आणि अमोल मासुळे यांनी सभागृहात आवाज उठवत प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. नगरसेवकांच्या आक्रमक भूमिकेमुळे काही काळ सभागृहातील वातावरण तापल्याचे चित्र पाहायला मिळाले. विविध प्रभागांतील नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडवाव्यात, अन्यथा प्रशासनाविरोधात तीव्र भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही काही सदस्यांनी दिला. अधिकाऱ्यांकडून आश्वासन नगरसेवकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले. शहरातील प्रलंबित कामांचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. या बैठकीला करूना डहाळे, मनोज वाघ यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, नगरसेवक आणि नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्राहक संरक्षण संस्थेच्या महत्त्वाच्या पदावर रमेश गुडेकर यांची नियुक्ती

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** सामाजिक कार्य, ग्राहक संरक्षण आणि जनहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने सक्रिय भूमिका बजावणारे श्री. रमेश साहेबराव गुडेकर यांची लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्था यांच्या वतीने महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची मुंबई महानगर उपाध्यक्ष तसेच ठाणे, पालघर आणि रायगड जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे.

ही नियुक्ती संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. दिनकर आमकर साहेब यांच्या शुभहस्ते आणि प्रमुख उपस्थितीत जाहीर करण्यात आली. यावेळी संस्थेचे महाराष्ट्र अध्यक्ष (मागासवर्गीय विभाग) मा. श्री. बाबाजी हरी नन्नवरे साहेब, मुंबई महानगर अध्यक्ष मा. श्री. पांडुरंग सकटे साहेब, संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. रमेश गुडेकर यांनी सामाजिक बांधिलकी जपत ग्राहक हक्क संरक्षणासाठी सातत्याने कार्य केले आहे. समाजातील विविध प्रश्नांवर त्यांनी प्रभावीपणे आवाज उठवत जनहिताच्या कामांना प्राधान्य दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत संस्थेने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांच्या नियुक्तीमुळे संस्थेच्या कार्याला अधिक बळ मिळून संघटनात्मक विस्तारास गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.


जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

# धुळ्यात भगत झाला हैवान, तेरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे वर्षभर शारीरिक शोषण

## भोंदू भगतसह त्याच्या साथीदाराला अटक, किन्नर समाज रस्त्यावर, नराधमाला फाशीच्या शिक्षेची मागणी.....

सुनील निकम
जन सम्राट टाईम्स

**धुळे :** धुळ्यात अध्यात्माच्या नावाखाली तेरा वर्षीय अल्पवयीन मुलीचे वर्षभर शारीरिक शोषण करणाऱ्या नराधम 1) कृष्णा उर्फ भगत सुभाष चित्ते रा. कदमबांडे नगर देवपूर धुळे, या भोंदू भगतसह त्याच्या साथीदारा विरोधात पश्चिम देवपूर पोलिसात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी अवघ्या काही तासातच भोंदू भगतसह त्याच्या साथीदाराला बेड्या ठोकल्या आहे. धुळ्यात घडलेल्या या प्रकारामुळे चांगलीच खळबळ उडाली आहे. या प्रकारामुळे अध्यात्माच्या आड विकृत चाळे करणाऱ्या भोंदू भगतचा पर्दाफाश झाला आहे. घडलेल्या या घटनेमुळे किन्नर समाज रस्त्यावर उतरत नराधमासह त्याच्या साथीदाराला फाशीची शिक्षा देण्याची मागणी किन्नर आखाड्याचे महामंडलेश्वर पार्वती जोगी यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. तेरा वर्षीय अल्पवयीन पीडित तरुणी वर्षभरापूर्वी मसाल्याची पुडी देण्यासाठी भोंदू भगतच्या घरी गेली होती. यावेळी भोंदू भगतने त्या तरुणीवर जबरदस्तीने शारीरिक संबंध केले. केलेल्या संबंधाची अश्लील चित्रफित तयार करून त्या चित्रफित च्या माध्यमातून वर्षभर अल्पवयीन पीडित तरुणीवर भोंदू भगतसह त्याच्या साथीदाराकडून वारंवार शारीरिक शोषण करण्यात आलं. अखेर अल्पवयीन तरुणीच्या आजीच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघड झाला आहे. गेल्या वर्षभरापासून भोंदू भगतसह त्याच्या साथीदाराकडून होत असलेल्या शारीरिक शोषणामुळे अल्पवयीन तरुणी मोठ्या प्रमाणात अस्वस्थ झाली होती. नुकत्याच गावावरून आलेल्या आजीने तरुणीची अस्वस्थेकडे गांभीर्याने लक्ष देऊन तरुणीला विश्वासात घेतल्याने अल्पवयीन तरुणीने आजीकडे संपूर्ण घटनेच कथन केल्याने अखेर आजीने पीडित अल्पवयीन तरुणीसह पश्चिम देवपूर पोलीस स्टेशन गाठत भोंदू भगतसह त्याच्या साथीदारा विरोधात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखत दोघांना गजाआड केले आहे.





### नराधमाला फाशीची केली मागणी....

अल्पवयीन मुलीवर घडलेल्या अत्याचारानंतर धुळ्यात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहे. या घटनेच्या विरोधात किन्नर समाजाने रस्त्यावर उतरत घटनेचा निषेध नोंदवला आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत या प्रकरणाची सखोल चौकशी करून नराधम भोंदू भगतसह त्याच्या साथीदाराला फाशीच्या शिक्षा देण्यात यावी अशी मागणी किन्नर आखाड्याचे महामंडलेश्वर पार्वती जोगी यांनी केली आहे.नाशिकच्या अशोक खरात या भोंदू बाबाच प्रकरण ताजा असतानाच धुळ्यात देखील भोंदू भगत ने अल्पवयीन तरुणीवर अत्याचार केल्याने चांगलीच खळबळ माजली आहे. या नराधमा विरोधात कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी समोर आली आहे.

"धुळे शहरात घडलेल्या धक्कादायक प्रकाराचा आम्ही तीव्र निषेध करत आज जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. स्वतःला तृतीयपंथी तसेच "भगत" म्हणवून घेणाऱ्या भोंदू व्यक्तीने केलेले कृत्य अत्यंत संतापजनक आहे. आज एका निष्पाप मुलीसोबत ही घटना घडली, उद्या अशाच प्रकारे इतरांनाही बळी जावे लागू शकते, अशी भीती निर्माण झाली आहे. शहरात अनेक भोंदू लोक "आमच्यात माता येते" असे सांगून भोळ्या जनतेची फसवणूक करत आहेत. अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीच्या नावाखाली लोकांची मानसिक व आर्थिक लूट सुरू असून अशा घटनांमुळे समाजात चुकीचा संदेश जात आहे. विशेष म्हणजे, असे लोक तृतीयपंथी समाजाचीही बदनामी करत आहेत. त्यांचा आमच्या समाजाशी किंवा कोणत्याही धार्मिक मठाशी संबंध नाही. या प्रकरणातील मुख्य आरोपीसह संबंधित सर्व दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. राज्यात महिलांवरील आणि लहान मुलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत असल्याने सरकारने भोंदूगिरीविरोधात कठोर कायदे आणि प्रभावी कारवाई करावी, अशी आमची ठाम मागणी आहे.



- पार्वती जोगी -
**महामंडलेश्वर, किन्नर आखाडा धुळे**

» Selected

## स्वायत्त असल्याचा देखावा कशासाठी?

पुणे : निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठीच्या निवड समितीमध्ये एका कॅबिनेट मंत्र्याचा समावेश करण्यावर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निर्णय प्रक्रियेत कोणताही मंत्री पंतप्रधानांच्या विरोधात जाऊ शकणार नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. निवडणूक आयुक्त नियुक्ती प्रक्रिया स्वायत्त असल्याचा हा देखावा कशासाठी, असा सवाल न्यायालयाने निवड समितीच्या सध्याच्या रचनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना केला. मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) आणि निवडणूक आयुक्त (ईसी) यांच्या नियुक्तीशी संबंधित २०२३ च्या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या कायद्यानुसार निवडणूक आयुक्तांच्या निवड समितीमधून सरन्यायाधीशांना वगळण्यात आले होते. या समितीत सध्या पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि एका केंद्रीय कॅबिनेट मंत्र्याचा समावेश आहे.

# धरणगाव तालुक्याला मोठा दिलासा!

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पुढाकाराने अंजनी धरणातून पाणी सोडणार

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव / जळगाव प्रतिनिधी** : मे महिन्याच्या तीव्र उन्हामुळे पाण्याच्या भीषण टंचाईचा सामना करणाऱ्या धरणगाव तालुक्यातील नागरिकांसाठी अखेर दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या विशेष पुढाकारातून शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी अंजनी धरणातून पिण्याच्या पाण्यासाठी बिगर सिंचन आवर्तन सोडण्यात येणार आहे. या निर्णयामुळे धरणगाव तालुक्यातील तब्बल ११ गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. गेल्या काही दिवसांपासून परिसरातील विहिरी, बोअरवेल आणि जलस्रोत कोरडे पडल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत होती. विशेषतः महिलांना हंडाभर पाण्यासाठी मैलोनमैल भटकंती करावी लागत होती. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेत प्रशासनाने युद्धपातळीवर हालचाली सुरू करत तातडीने निर्णय घेतला. निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांच्या आदेशानुसार गिरणा पाटबंधारे विभागाने पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. कार्यकारी अभियंता विनोद पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार सकाळपासून अंजनी नदीपात्रात सुमारे १५० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग केला जाणार आहे. हे पाणी पिंप्रीमार्गे सोनवदपर्यंत पोहोचणार असून धरणगाव तालुक्यातील अनेक गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्पुरता का होईना, पण सुटणार आहे. या आवर्तनाचा लाभ कल्याण (खु.), वाघळूद, चावलखेडा, पिंपळेसीम, भोद बु., हणमंतखेडे खु., पिंप्री खु., कल्याणेहोळ, भोद खु., हिंगोणे खु. आणि सतखेडा या गावांना होणार आहे. गेल्या काही आठवड्यांपासून या गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती. पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना टँकरवर अवलंबून राहावे लागत होते. काही ठिकाणी तर पाण्यासाठी वाद-विवाद आणि संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र आता अजनी धरणातून पाणी सोडण्याच्या निर्णयामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. धरणातून सोडण्यात येणारे पाणी हे केवळ पिण्यासाठी आरक्षित असल्याने नदीकाठच्या शेतकऱ्यांना कृषीपंप बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांच्या आदेशानुसार गिरणा पाटबंधारे विभागाने पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. कार्यकारी अभियंता विनोद पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार सकाळपासून अंजनी नदीपात्रात सुमारे १५० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग केला जाणार आहे. "कोणीही शेतीसाठी पाण्याचा उपसा करू नये. हे पाणी शेवटच्या गावापर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे," असे निर्देश पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिले आहेत. यासाठी महसूल आणि पोलीस प्रशासनाची विशेष पथके नदीपात्र परिसरावर लक्ष ठेवून असणार आहेत.

### "पाण्याचा प्रत्येक थेंब जपा"

या निर्णयानंतर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी नागरिकांना भावनिक आवाहन करत सांगितले की, "ग्रामीण भागातील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. नागरिकांसह मुक्या जनावरांनाही पिण्याचे पाणी मिळावे यासाठी हे आवर्तन सोडले जात आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पाण्याचा अत्यंत काटकसरीने आणि जबाबदारीने वापर करावा." दरम्यान, प्रशासनाच्या या तातडीच्या निर्णयामुळे धरणगाव तालुक्यातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत पालकमंत्री आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# भाजपमध्ये गटबाजी उफाळली?

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी:** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक पदांच्या नियुक्तीवरून भारतीय जनता पक्षात अंतर्गत गटबाजी उघडपणे समोर येत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. भाजपकडून स्वीकृत नगरसेवक पदांसाठी सात नावे जाहीर होण्याची शक्यता असताना, त्यामध्ये भाजप कार्यकर्ता सचिन काळभोर यांचे नाव नसल्याचे संकेत विशेष सूत्रांकडून मिळत आहेत. विशेष म्हणजे, भोसरीचे आमदार महेश लांडगे आणि सचिन काळभोर यांच्यातील जुना राजकीय संघर्ष पुन्हा चर्चेत आला आहे. विधानसभा निवडणुकीदरम्यान काळभोर यांनी महेश लांडगे यांना भाजपची उमेदवारी देऊ नये, अशी भूमिका घेतल्याची चर्चा होती. यासाठी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडेही मागणी केल्याचे बोलले जात होते. स्वीकृत नगरसेवक पदावरून राजकीय संघर्ष? आता स्वीकृत नगरसेवक पदांसाठी भाजपकडून अंतिम नावे निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असताना, महेश लांडगे यांनी आपल्या समर्थक कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, त्यांच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या सचिन काळभोर यांना संधी न देण्यासाठीही जोरदार विरोध होत असल्याचे राजकीय सूत्रांचे म्हणणे आहे. सचिन काळभोर हे चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांचे कट्टर समर्थक मानले जातात. त्यामुळे भाजपमधील वेगवेगळ्या गटांमध्ये स्वीकृत नगरसेवक पदांवरून रस्सीखेच सुरू असल्याचे स्पष्ट होत आहे. स्थायी समिती सभेकडे लक्ष दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत अद्याप या विषयावर ठराव न आल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# धरणगावला रेल्वेची मोठी भेट!

## प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव** : धरणगाव शहर आणि तालुक्यातील रेल्वे प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी 07717/18 स्पेशल ट्रेन आता नियमित रेल्वे सेवेत रूपांतरित करण्यात आली असून 17295/96 काकीनाडा टाउन-हिसार एक्सप्रेसच्या नियमित सेवेला धरणगाव रेल्वे स्थानकावर उत्साहपूर्ण वातावरणात हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या बहुप्रतिक्षित रेल्वे सेवेच्या शुभारंभामुळे धरणगावसह परिसरातील प्रवाशांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. दीर्घ काळापासून या मार्गावरील रेल्वे सेवा नियमित करण्याची मागणी प्रवासी संघटना आणि नागरिकांकडून सातत्याने केली जात होती. अखेर रेल्वे प्रशासनाने या मागणीची दखल घेत नियमित सेवा सुरू केल्याने धरणगावकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. या रेल्वे सेवेमुळे महाराष्ट्रासह उत्तर आणि दक्षिण भारताशी रेल्वे संपर्क अधिक मजबूत होणार असून विद्यार्थी, व्यापारी, नोकरीधारक तसेच सर्वसामान्य प्रवाशांना मोठा लाभ मिळणार आहे. धरणगाव रेल्वे स्थानकावर आयोजित उद्घाटन कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून स्वागत करण्यात आले. यावेळी पत्रकार राजेंद्र वाघ यांनी बोलताना सांगितले की, "प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कोठारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे धरणगाव शहरासह जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांना ही मोठी दिलासादायक भेट मिळाली आहे." या प्रसंगी नियमित रेल्वे सेवेचे उद्घाटन व लोको पायलट अरविंद टी. आर. तसेच असिस्टंट लोको पायलट तुळशीराम मीणा यांचे स्वागत पत्रकार भागीरथ माळी, राजेंद्र वाघ आणि विजयकुमार शुक्ला यांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन रेल्वे कर्मचाऱ्यांचा सत्कारही केला. सेवेचा सर्वाधिक फायदा दूरवर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होणार असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

### प्रवासी मंडळाचा आनंदोत्सव

रेल्वे आगमनानंतर धरणगाव तालुका प्रवासी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी जल्लोष करत स्वागत केले. कार्यक्रमास प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कोठारी, किरण वाणी, डॉ. पंकज अमृतकर, डॉ. स्वप्नील पाटील, आनंद वाजपेयी, सुदाम चौधरी यांच्यासह मोठ्या संख्येने रेल्वे प्रवासी आणि नागरिक उपस्थित होते. समारंभादरम्यान उपस्थितांनी या रेल्वे सेवेच्या समाधान व्यक्त करत ही सेवा धरणगावच्या विकासाला नवी गती देईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी धरणगाव तालुका प्रवासी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थित मान्यवर, रेल्वे कर्मचारी, पत्रकार आणि नागरिकांचे आभार मानण्यात आले.

# खरात प्रकरणी; उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे-पाटील निलंबित

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** नाशिकमधील चर्चित भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. भोंदूबाबा अशोक खरात याच्यासोबत आर्थिक व्यवहार आणि निकटचे संबंध असल्याच्या आरोपांमुळे उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे-पाटील यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी केली. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात सक्षम प्राधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या अभिजीत भांडे-पाटील यांचे नाव अशोक खरात प्रकरणात समोर आल्यानंतर प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. अशोक खरातच्या पत्नी आणि मुलीच्या नावे असलेल्या जमिनीमध्ये गुंतवणूक केल्याच्या आरोपांमुळे भांडे-पाटील यांच्या अडचणी वाढल्या आहेत. तपासादरम्यान अशोक खरात आणि अभिजीत भांडे-पाटील यांच्यातील तब्बल १४३ फोन कॉल्सची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये अशोक खरातने ८३ वेळा, तर भांडे-पाटील यांनी ६० वेळा संपर्क साधल्याचे उघड झाले आहे. या कॉल रेकॉर्डनंतर महसूल विभागाने तातडीने निलंबनाची कारवाई केली. महसूल विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार, अभिजीत भांडे-पाटील यांच्यावर संघटित गुन्हेगारी, फसवणूक आणि शोषणाच्या गुन्ह्यांमध्ये आरोपी असलेल्या अशोक खरात याच्यासोबत निकटचे संबंध ठेवल्याचे गंभीर आरोप आहेत. तसेच शासकीय पदाचा गैरवापर करून संबंधित व्यक्तीस बेकायदेशीर फायदा पोहोचवणे, गोपनीय माहिती लीक करणे आणि आर्थिक लाभ मिळवण्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. प्राथमिक चौकशीत त्यांच्या वर्तणुकीमुळे शासनाची प्रतिमा मलिन झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. हे कृत्य महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चे उल्लंघन करणारे असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे त्यांच्याविरोधात विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

# पाचोऱ्यात ऑनलाइन कल्याण मटक्यावर पोलिसांचा छापा

## ८९ हजारांचा मुद्देमाल जप्त; मुख्य आरोपी फरार

जन सम्राट टाईम्स



**पाचोरा प्रतिनिधी:** पाचोरा शहरातील रामानंद नगर परिसरात सुरू असलेल्या ऑनलाइन कल्याण मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांनी अचानक छापा टाकत तब्बल ८९ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मात्र, या कारवाईदरम्यान एकही संशयित पोलिसांच्या हाती न लागल्याने संपूर्ण प्रकरणाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मुख्य आरोपीसह इतर साथीदार घटनास्थळावरून पसार होण्यात यशस्वी झाल्याने पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, रामानंद नगर भागातील एका बंद पत्र्याच्या गोडाऊनमध्ये ऑनलाइन कल्याण मटका सुरू असल्याची माहिती पिंपळगाव (हरेश्वर) पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास पोलिसांनी अचानक छापा टाकला. यावेळी घटनास्थळावर मोठ्या प्रमाणात जुगारासाठी वापरले जाणारे साहित्य आढळून आले. ८९ हजारांचा मुद्देमाल जप्त या कारवाईत पोलिसांनी ८९ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.
त्यामध्ये ४० हजार रुपये किमतीचे चार प्रिंटर, ३० हजार ५०० रुपये किमतीचे ६१ मोबाईल संच, तसेच प्रिंटर, कॅल्क्युलेटर, पेन, नोटबुक आणि इतर साहित्याचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यापूर्वी सुनील देवराम भोई याच्यावर कारवाई करण्यात आली होती. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनंतर पाचोऱ्यातील संतोष पाटील हा मोबाईल फोनच्या माध्यमातून स्वतःच्या फायद्यासाठी ऑनलाइन मटका जुगार चालवत असल्याचे समोर आले होते. पोलिस येण्यापूर्वीच आरोपी पसार? पोलिसांनी छापा टाकला असता जुगाराचे साहित्य घटनास्थळी मिळाले, मात्र तेथे कार्यरत असलेले कर्मचारी आणि मुख्य आरोपी पसार झाल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईची माहिती आधीच आरोपींपर्यंत पोहोचली होती का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. स्थानिकांमध्ये "मटका अड्ड्यावर छापा पडण्यापूर्वीच आरोपींना खबर कोणी दिली?" याबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे. तसेच जप्त केलेल्या मुद्देमालातील काही महत्त्वाचे साहित्य पुन्हा मटका चालविणाऱ्यांकडे परत दिल्याचीही चर्चा परिसरात रंगली आहे.

### गुन्हा दाखल, तपास सुरू

.या प्रकरणी पिंपळगाव (हरेश्वर) पोलीस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक विठ्ठल पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष पाटील व इतर साथीदारांविरोधात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पाचोरा उपविभागीय पोलीस अधिकारी बापू रोहोम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अवैध धंद्यांवर नियंत्रणाची मागणी दरम्यान, पिंपळगाव (हरेश्वर) पोलीस स्टेशन हद्दीत गेल्या काही महिन्यांपासून अवैध धंद्यांचे प्रमाण वाढल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. अनेक वेळा तक्रारी होऊनही मटका, जुगार आणि इतर अवैध व्यवसाय थांबत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

# कुंभमेळ्यासाठी हजारो कोटी, पण विद्यार्थ्यांसाठी निधी नाही?

## मुख्यमंत्री फडणवीसांना राजाराम खरात यांचा सवाल

जन सम्राट टाईम्स



**मुंबई। प्रतिनिधी** : कुंभमेळ्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्याच्या घोषणेनंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर. के.)चे पक्षाध्यक्ष राजाराम खरात यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत शिक्षण आणि गरीब विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी "कुंभमेळ्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही," असे वक्तव्य केल्यानंतर खरात यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनातून सरकारच्या प्राधान्यक्रमांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. खरात यांनी म्हटले आहे की, "ज्यातून काहीही निष्पन्न होणार नाही आणि पर्यावरणाचा ऱ्हास होणार आहे, अशा कामांसाठी सरकार ४० ते ५० हजार कोटी रुपये खर्च करत आहे. मात्र दुसरीकडे अनेक मराठी शाळा बंद पडत आहेत. गरीब पालकांना RTE अंतर्गत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ८ ते ९ हजार रुपयांचे पुस्तके, वह्या आणि शालेय साहित्य घेणे परवडत नाही." त्यांनी सरकारला थेट सवाल करत म्हटले की, "कुंभमेळ्यासाठी पैसे आहेत, मग शिक्षणासाठी पैसे नाहीत असे कसे? कुंभमेळ्यासाठी ८० ते ९० हजार कोटी रुपये खर्च करा, पण त्यातील किमान दोन टक्के निधी तरी गरीब विद्यार्थ्यांसाठी द्या." शिक्षणाला प्राधान्य देण्याची मागणी राजाराम खरात यांनी राज्यातील बंद पडलेल्या मराठी शाळांचा मुद्दाही उपस्थित केला. "सरकार बंद झालेल्या मराठी शाळा पुन्हा सुरू करेल, याची अपेक्षा नाही. पण निदान गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार तरी करावा," अशी मागणी त्यांनी केली. त्याचबरोबर त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना भविष्यातील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.

# पारोळ्यात वारंवार वीज खंडित; नागरिक संतप्त!

## सामाजिक कार्यकर्त्यांचा महावितरणाला इशारा

जन सम्राट टाईम्स



**पारोळा | प्रतिनिधी** : पारोळा शहरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या वारंवार वीज खंडित होण्याच्या प्रकारामुळे नागरिक, व्यापारी, विद्यार्थी आणि रुग्णालये मोठ्या अडचणीत सापडली आहेत. वाढत्या उकाड्यात सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे संतप्त झालेल्या अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटना, डॉक्टर्स असोसिएशन तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी महावितरण विभागाला निवेदन देत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. रुग्णांच्या जीवितास धोका डॉक्टर्स असोसिएशन पारोळा यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सतत वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे गंभीर रुग्णांच्या उपचारांमध्ये मोठे अडथळे निर्माण होत आहेत. अनेक महत्त्वाची वैद्यकीय उपकरणे इन्व्हर्टरवर कार्यरत राहत नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. रुग्णालये ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे वीज पुरवठा सुरळीत आणि अखंड ठेवण्याची मागणी डॉक्टर संघटनेने केली आहे. वारंवार होणाऱ्या वीज खंडित प्रकारामुळे आरोग्य व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता देखील व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांसह नागरिक त्रस्त अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटना यांनी आपल्या निवेदनात शहरातील वाढत्या लोडशेडिंगचा मुद्दा उपस्थित केला. कमी दाबाचा वीज पुरवठा, रात्री अचानक वीज जाणे आणि तासन्तास अंधाराचे वातावरण यामुळे नागरिक त्रस्त झाले असल्याचे संघटनेने नमूद केले.
सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढलेली असताना वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत असल्याचे संघटनेने म्हटले आहे. आंदोलनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते आणि दोन्ही संघटनांनी महावितरण प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. पारोळा शहरातील वीज समस्या कायमस्वरूपी सोडवण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. शहरातील नागरिकांनी देखील वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# जळगाव-जालना रेल्वे प्रकल्पावरून पहूरमध्ये शेतकरी आक्रमक

## "योग्य मोबदल्याशिवाय एक इंचही जमीन देणार नाही"; भूसंपादन बैठकीत प्रशासनाला ठणकावले

जन सम्राट टाईम्स



**पहूर | प्रतिनिधी** : जालना रेल्वे प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेविरोधात पहूर येथे आयोजित बैठकीत शेतकऱ्यांचा तीव्र संताप पाहायला मिळाला. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी संपादित करताना शासनाने योग्य मोबदला, पुनर्वसन आणि भविष्यातील उपजीविकेची हमी द्यावी, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी मांडली. "योग्य आणि भरघोस मोबदला मिळाल्याशिवाय एक इंचही जमीन देणार नाही," असा इशारा शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला. बुधवारी (दि. १३ मे) पार पडलेल्या या बैठकीस एरंडोल विभागाचे उपविभागीय अधिकारी मनीषकुमार गायकवाड उपस्थित होते. त्यांनी "कायद्याच्या चौकटीत राहून प्रत्येक शेतकऱ्याला न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल," असे आश्वासन दिले. मात्र, ग्रामस्थांनी केवळ तोंडी आश्वासनांवर विश्वास ठेवणार नसल्याचे स्पष्ट करत सर्व निर्णय लेखी स्वरूपात देण्याची मागणी केली. बैठकीदरम्यान अनेक शेतकरी भावनिक झाले. "आमच्या जमिनी म्हणजे फक्त सातबाऱ्यावरची नोंद नाही, तर आमच्या पिढ्यानपिढ्यांच्या जगण्याचा आधार आहे," अशा शब्दांत त्यांनी आपली व्यथा मांडली. रेल्वे प्रकल्पामुळे सुपीक शेती जमीन जाणार असल्याने ग्रामीण भागात अस्वस्थता वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले. खानदेशला मराठवाड्याशी जोडणारा जळगाव-जालना रेल्वे प्रकल्प विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात असला, तरी "विकास हवा; पण शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्ततेच्या किंमतीवर नको," अशी ठाम भूमिका बैठकीत मांडण्यात आली. शेतकऱ्यांनी २०१३ च्या भूसंपादन कायद्याचा संदर्भ देत अनेक महत्त्वाच्या मागण्या प्रशासनासमोर ठेवल्या. त्यामध्ये बाजारभावापेक्षा अधिक दराने एकरकमी मोबदला, प्रत्येक बाधित कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी, रेल्वे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र तसेच रेल्वेमार्गामुळे शेताचे तुकडे झाल्यास पर्यायी रस्त्याची सुविधा देण्याची मागणी करण्यात आली. "शेती ही आमची काळी माय आहे.

### वातावरण काही काळ तणावपूर्ण

बैठकीदरम्यान वातावरण काही काळ तणावपूर्ण झाले होते. काही राजकीय व्यक्ती गोड बोलून शेतकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करतील, मात्र प्रत्यक्ष लाभ मिळाल्याशिवाय जमीन देणार नसल्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला.या बैठकीस रेल्वे विभागाचे अरविंद रायबोले, मनोज सिंह, प्रशांत सिंह, तहसीलदार नानासाहेब आगळे, भूमी अभिलेख उपअधीक्षक लेकुरवाळे उपस्थित होते.